गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदयाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय दक्षता पथक (Task Force) स्थापन करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय क्र.प्रचिनी-२०११/प्र.क्र.२५६/कु.क.-२

## मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दि. १३.१०.२०११

**वाचा :** १) आयुक्त (कु.क.) व अभियान संचालक, रा.ग्रा.आ.अ., मुंबई यांचे क्र.राआसो /पीएनडीटी /दप/२३१०८-०९/११, दि.३०.०८.२०११

**प्रस्तावना :**

इ.स. २०११ च्या जनगणनेच्या प्राथमिक अहवालावरुन ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलींचे प्रमाण दर एक हजार मुलांमागे ३० अंकांनी म्हणजेच ९१३ वरुन ८८३ इतके कमी झालेले आहे.

स्त्री भ्रुण हत्या थांबविण्यासाठी मागील १० वर्षापासून शासनामार्फत सर्वच स्तरावर मोठया प्रमाणात जनजागृती, विविध स्तरावर प्रशिक्षण इ. मोहिमा राबविण्यात येत आहेत. तद्वतच शासनामार्फत गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारीत २००३ ची राज्यातील सर्व समुचित प्राधिकाऱ्यांच्या मार्फत मोठया प्रमाणात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) या कायदयानुसार जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व तहसिलदार तसेच महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, इ. यांना समुचित प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. प्रत्येक जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागात सोनोग्राफी केंद्रांना मंजूरी देण्यात येत असते. सर्वच सोनोग्राफी केंद्राची नियमित तसेच अचानक तपासणीची धडक मोहिम आरोग्य विभागामार्फत वेळोवेळी राबविण्यात येत असते. असे असले तरीदेखील अशा सोनोग्राफी केंद्राच्या ठिकाणी गर्भलिंग निदान करुन स्त्री भ्रुण हत्या होत असल्याचे गुन्हे निदर्शनास येत आहेत.

त्यानुषंगाने जिल्हयातील विविध समुचित प्राधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा घेणे, त्यांच्यामध्ये समन्वय ठेवणे, पीसीपीएनडीटी कायदयाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करणे, स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी जनजागृती करणे, आदींसाठी जिल्हा स्तरावर दक्षता पथक स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा २००३ ची कडक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने जिल्हयातील विविध समुचित प्राधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा घेणे, त्यांच्यामध्ये समन्वय ठेवणे, पीसीपीएनडीटी कायदयाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करणे, स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी जनजागृती करणे, आदींसाठी जिल्हा स्तरावर दक्षता पथक स्थापन करण्यास शासन या शासन निर्णयाद्वारे मान्यता देत आहे.

जिल्हास्तरावरील दक्षता पथकाची रचना खालीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, महानगरपालिका (जिल्हयात महापालिका असल्यास) | सह अध्यक्ष |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ४ | पोलीस अधिक्षक | सदस्य |
| ५ | जिल्हा शल्य चिकित्सका | सदस्य सचिव |
| ६ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मनपा | सदस्य |
| ७ | सर्व समुचित प्राधिकारी | सदस्य |
| ८ | जिल्हा शासकीय अभिभोक्ता | सदस्य |
| ९ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| १० | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| ११ | शिक्षण अधिकारी (माध्यमिक / प्राथमिक) | सदस्य |
| १२ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) | सदस्य |
| १३ | समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| १४ | पत्रकार संघ प्रतिनिधी | सदस्य |
| १५ | स्त्री भ्रुण हत्येविरोधात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १६ | जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटतील असे इतर सदस्य | सदस्य |

वरील दक्षता पथकाच्या कार्यकक्षेमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :.

- जिल्हयातील सर्व समुचित प्राधिकारी यांनी केलेल्या कामाचा आढावा घेणे
- जिल्हा व तालुका सल्लागार समितीच्या कामाचा आढावा घेणे
- F फॉर्म ऑनलाईन कामाचा आढावा घेणे
- टोल फ्री नंबर, आमची मुलगी डॉट कॉम वेबसाईट व इतर माध्यमातून प्राप्त झालेल्या तक्रारींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे
- स्त्री भ्रुण हत्या टाळण्याच्या अनुषंगाने सामाजिक संस्थांच्या सहभागाने प्रबोधनात्मक जनजागृती कार्यक्रम राबविणे
- जिल्हयातील / तालुक्यातील सोनोग्राफी केंद्र, एमटीपी केंद्र यांची नोंदणी / नुतनीकरण याबाबत आढावा घेणे

गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदयाचा प्रसार, प्रचार व प्रभावी अंमलबजावणी करुन स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपाय योजनेचा भाग म्हणून

जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हास्तरीय दक्षता पथक कार्यरत राहील. त्याची बैठक दरमहिन्याचा ५ तारखेस (सुट्टी असल्यास लगतच्या कामाकाजाच्या दिवशी) घेण्यात येईल व त्याचा कार्यवृत्तांत दरमहा अतिरिक्त संचालक, कु.क., पुणे यांना सादर करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(पा.म.ताकटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका (मुंबई वगळून, सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद - सर्व)
पोलीस अधिक्षक (सर्व, जिल्हे)
पोलीस आयुक्त (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी (सर्व, महानगरपालिका)
जिल्हा शासकीय अभिभोक्ता (सर्व, जिल्हे)
जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व, जिल्हे)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व, जिल्हे)
शिक्षण अधिकारी, माध्यमिक / प्राथमिक (सर्व, जिल्हे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण (सर्व)
समाजकल्याण अधिकारी (सर्व, जिल्हे)
आयुक्त (कु.क.) व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे (सर्व समुचित प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह)
सह संचालक, आरोग्य सेवा (आरोग्य), पुणे
उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे / नागपूर / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अकोला / कोल्हापूर / लातूर.
निवड नस्ती, कु.क.२